दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २०६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२१ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल शहरात रयत शिक्षण संस्थेचे वटवृक्ष फुलणार

## महापालिकेच्या मालकीची जागा रयत शिक्षण संस्थेस भाडेतत्वावर देण्यास महासभेत मंजुरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल महानगरपालिकेच्या मालकीचे पनवेल येथील अं.भु.क्र.२७३ ही जागा रयत शिक्षण संस्थेस भाडेतत्वावर देण्यास महासभेत मंजुरी देण्यात आलेली आहे. याबाबत पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा ठेवणारे आमदार बाळाराम पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांचे तसेच प्रशासन तसेच सभागृहाचे देखील आभार मानले आहेत.**



पनवेल महानगरपालिकेची स्थापना दिनांक १ ओक्टोबर २०१६ रोजी झाली. त्यामध्ये पूर्वाश्रमीचे नगरपरिषदचे क्षेत्र समाविष्ट केले आहे. पुर्वाश्रमीची पनवेल नगरपरिषद हद्दीतील अंतिम भूखंड क्रमांक २७३ (पार्ट) हा मंजूर विकास योजनेत व मंजूर नगररचना योजनेत प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड साठी आरक्षित आहे. सदर भूखंडाचे क्षेत्र ७१८८ चौ.मी. नगररचना योजनेनुसार आहे. पूर्वाश्रमीची पनवेल नगरपरिषदेची नगररचना योजना ही शासनाने दिनांक ३१ ऑगस्ट २००९ अन्वये मंजूर केली आहे. त्याचे अभिलेख (योजनेचे नकाशे व फॉर्म १) हे सन २०१६ रोजी प्राप्त झाले आहेत. त्यानुसार अभिलेख म्हणजेच भूखंडाचे मालमत्ता पत्रक व नकाशे करणेस उपअधीक्षक भूमी अभिलेख पनवेल यांना त्याच वेळी देण्यात आले आहेत. अंतिम भूखंड क्रमांक २७३ (पार्ट) या भूखंडाची मोजणी संबंधित विभागाकडून दिनांक १६ मार्च २०२१ रोजी झाली आहे. त्यानुसार त्याचे मालमत्ता पत्रक व भूखंडाचा नकाशा संबंधित विभागाकडून प्राप्त होणार आहे. तसेच सदर भूखंड हा महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ८८ अन्वये ताब्यात आलेला आहे. सदर भूखंडात महानगरपालिके मार्फत भूखंडाच्या काही भागात जलकुंभ उभारण्यात आलेला आहे. त्याचे क्षेत्र १२०० चौ.मी. आहे. भूखंड नकाशात दर्शविल्यानुसार स्वतंत्र ठेवण्यात यावा.

महानगरपालिकेच्या मालकीचे पनवेल येथील अं.भु.क्र.२७३ ही जागा रयत शिक्षण संस्था संस्थेस भाडेतत्वावर देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा ठेवणारे आमदार बाळाराम पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यानी विशेष प्रयत्न केले. अंतिम भूखंड क्रमांक २७३ (पार्ट) चे क्षेत्र ७१८८ चौ.मी. आहे त्यातील त्यावेळी मूळ भूखंडाचे ९०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात होते. ते क्षेत्र रयत शिक्षण संस्थेस देणेबाबत पूर्वाश्रमीची पनवेल नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७३२ हा तत्कालीन नगराध्यक्ष जे एम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८ नोव्हेंबर २००४ अन्वये देण्यास मान्यता दिली आहे. व उर्वरित क्षेत्रही ताब्यात आल्यावर देण्यास मान्यता दिली आहे. तरी सदर भूखंडाचे ताब्यात असलेले ९०० चौ.मी. क्षेत्र हे नाममात्र भाडयाने देण्यास हरकत नाही. असे पालिकेने म्हटले आहे.

> जे एम म्हात्रे नगराध्यक्ष असताना रयतच्या शाळेला जागा देण्यास ठराव करण्यात आला होता. त्याला आज मुहूर्त स्वरूप आलेले आहे जागेसाठी जी टांगती तलवार होती ती निघून गेली. त्याचे श्रेय आमदार बाळाराम पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांना जाते. रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी म्हणुन आज ठराव पास करण्यात आला. शाळेच्या उत्तर दायित्वतुन मुक्त झालो
> **- गणेश कडु- नगरसेवक, शेकाप**

> तत्कालीन नगरपरिषदेचे अध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली २००४ साली झालेल्या नगरपरिषदेच्या सभेत अं.भु.क्र.२७३ मधील ताब्यात असणारे ९०० चौ.मी जागा भाडेपट्यावर देऊन उर्वरित जागा ताब्यात आल्यावर देण्याचा ठराव पारित करण्यात आला होता. आजच्या सर्वसाधारण सभेत उर्वरित जागा देण्यासंदर्भातला विषय मंजूर करण्यात आला. सातत्याने पाठपुरावा ठेवणाऱ्या आमदार बाळाराम पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांचे आभार तसेच त्याबद्दल पालिका आयुक्त, प्रशासन तसेच सभागृहाचे देखील आभार.
> **- प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्षनेता, पनवेल महानगरपालिका**

# १ डिसेंबरपासून टीव्ही पाहणं महागणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पेट्रोल डिझेलच्या दरवाढीमुळे आधीच महागाई वाढल्याने सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती सोबत खाद्य तेल सुद्धा प्रचंड महाग झाले आहे. महागाईमुळे मेटाकुटीला आलेल्या सर्वसामान्य जनतेला आता आणखी एक झटका बसणार आहे. टीव्ही पाहण्यासाठी आता चॅनेल्ससाठी ५० टक्के जास्त खर्च करावा लागणार आहे. 'ट्राय'च्या नवीन दर आदेशाच्या अंमलबजावणीमुळे किंमती वाढवण्यात येणार आहेत. ही दरवाढ येत्या १ डिसेंबर २०२१ पासून लागू करण्यात येणार आहे.

देशातील प्रमुख ब्रॉडकास्टिंग चॅनेल स्टार प्लस, कलर्स, झी टीव्ही, स्टार, सोनी आणि तळरले१८ सह काही प्रादेशिक चॅनेल ने काही चॅनेल्स आपल्या बुकेतून बाहेर काढले आहेत. त्यामुळे टीव्ही पाहणाऱ्या ग्राहकांना ३५ ते ५० टक्क्यांपर्यंत अधिक खर्च करावा लागू शकतो. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाच्या नवीन दर आदेशाच्या अंमलबजावणीमुळे या किंमती वाढवण्यात येणार आहेत. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाने मार्च २०१७ मध्ये टीव्ही चॅनल्सच्या किंमतींबाबत नवीन टॅरिफ ऑर्डर जारी केल्या होत्या. त्यानंतर १ जानेवारी २०२० रोजी छढज २.० जारी करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या चॅनेलच्या किंमती बदलत आहेत. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाचे म्हणणे होते की, NTO 2.0 ग्राहकांना फक्त तेच चॅनेल निवडण्याचा आणि पेमेंट करण्याचा पर्याय आणि स्वातंत्र्य देईल, जे त्यांना पाहायचे आहेत.

एसपीएन चॅनेल पाहण्यासाठी आता मंथली ७१ रुपये मोजावे लागणार आहेत. आधी हे चॅनेल पाहण्यासाठी ३९ रुपये मोजावे लागत होते. झी साठी ४९ रुपये मोजावे लागू शकते. आता यासाठी फक्त ३९ रुपये मोजावे लागते. व्हायाकॉम १८ साठी मंथली ३९ रुपये मोजावे लागू शकते. आता यासाठी २५ रुपये मोजावे लागतात.

# सचिन सावंत शिवसेनेच्या वाटेवर?; मुख्यमंत्री ठाकरे यांची घेतली भेट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संघटनात्मक जबाबदाऱ्यांचे वाटप करताना सचिन सावंत यांना धक्का दिला. अतुल लोंढे यांच्याकडे राज्यात मुख्य प्रवक्तेपदाची जबाबदारी देताना सावंत यांना दुय्यम स्थान देण्यात आले. त्यानंतर सावंत यांनी थेट काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याकडे प्रवक्तेपदाचा राजीनामा सोपवला. या घडामोडीमुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमधील गृहकलह चव्हाट्यावर आला असतानाच सावंत हे आता नवा भूकंप घडवण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत.



सचिन सावंत हे शिवसेनेच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यासाठी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे हे आग्रही असल्याचे सांगण्यात येत असून सावंत व आदित्य ठाकरे यांचे बोलणेही झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. महत्त्वाचे म्हणजे सचिन सावंत हे आज थेट वर्षा निवासस्थानी पोहचले व त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. जवळपास १० मिनिटं या दोहोंत चर्चा झाली. या चर्चेचा तपशील मिळू शकला नसला तरी आदित्य यांच्या माध्यमातून ही भेट घडवून आणण्यात आल्याचे सांगितले जात आहे. याबाबत सचिन सावंत किंवा शिवसेनेतून अधिकृतपणे कोणतीही प्रतिक्रिया अद्याप देण्यात आलेली नाही.

दरम्यान, सचिन सावंत हे जवळपास दहा वर्षे महाराष्ट्र काँग्रेसच्या प्रवक्तेपदाची धुरा वाहत होते. त्यांनी सातत्याने भाजपवर धारदार वार केलेले आहेत. अनेक आरोप पुराव्यांसकट करून भाजपच्या अनेक नेत्यांच्या अडचणी वाढवण्याचे काम सावंत यांनी केले होते. राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतरही सरकारची बाजू पत्रकार परिषदा व सोशल मीडियाच्या माध्यमातून ते भक्कमपणे मांडत आले आहेत. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या संयमी नेतृत्वाचे त्यांनी अनेकदा कौतुक केले आहे. त्यामुळेच आता प्रवक्तेपद सोडल्यानंतर सावंत हे काँग्रेसमध्येच राहणार की नवा राजकीय पर्याय शोधणार, याकडे अनेकांचे लक्ष लागले असून सावंत यांचा कल शिवसेनेकडे असल्याचे हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे.

## संक्षिप्त...

### भारतात येणाऱ्या सर्व प्रवाशांना आरटीपीसीआर चाचणी अहवाल निगेटिव्ह असणं अनिवार्य



**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात येणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी आरटीपीसीआर चाचणीचाअहवाल निगेटिव्ह असणं आता अनिवार्य करण्यात आलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून बुधवारी यासंदर्भातील नवीन गाइडलाइन्स जारी करण्यात आल्या आहेत.

यानुसार भारतात येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचा ७२ तासांपूर्वीचा कोरोना चाचणी अहवाल निगेटिव्ह असणं बंधनकारक असणार आहे. सर्व प्रवाशांना आपल्या कोरोना चाचणीच्या अहवालाची प्रत सादर करावी लागणार आहे. ब्रिटनसह जगातील बहुतांश देशांमध्ये सध्या कोरोना महामारीच्या डेल्टा व्हेरिअंटनं धुमाकूळ घातला आहे. ब्रिटनमध्ये ११ ऑक्टोबरनंतर दैनंदिन पातळीवर ४० हजाराहून अधिक नवे रुग्ण आढळत आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतानं आंतरराष्ट्रीय प्रवासाबाबत नियमांमध्ये पुन्हा कडक नियम लागू केले आहेत. भारतात ११ ते १७ ऑक्टोबर दरम्यान कोरोनाच्या दैनंदिन आकडेवारीत १८ टक्के आणि संक्रमणामुळे होणाऱ्या मृत्यूचं प्रमाण १३ टक्क्यांनी कमी झालं आहे, अशी माहिती खुद्द जागतिक आरोग्य संघटनेनेच दिली आहे. युरोप वगळता इतर अनेक ठिकाणी दर आठवड्यात समोर येणाऱ्या आकडेवारीत घट पाहायला मिळत असल्याचंही नमदू करण्यात आलं आहे.

# दिवेआगर येथे अनधिकृत भराव?

## तक्रार करताच तलाठ्यांनी केला पंचनामा

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील अनधिकृत भराव टाकल्याची घटना समोर आली आहे. जागरूक नागरिक व पत्रकारांनी याबाबतीत आवाज उठवल्यानंतर तलाठी निलेश पवार यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली व पंचनामा केला आहे.

दिवेआगर मधील हनुमान पाखाडी येथे समुद्र नजीक सुरू असलेल्या इमारती साठी हा भराव होत होता. महसूल कडून कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. विशेष म्हणजे फक्त शनिवारी व रविवारी या सुट्ट्यांच्या दिवशी रात्री हा भराव होत होता. त्यामुळे अनधिकृत भराव असल्याचे संशय बळावला. दिवेआगर हे प्रसिद्ध पर्यटन तसेच धार्मिक स्थळ असल्याने येथील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. अशातच स्थानिक पुढारी यांना हाताशी धरून अशा अनधिकृत व चोरून काम करण्याची पद्धत वापरली जाते. आवाज उठवल्यानंतर महसूल कारवाईची छडी उगारते. यातून महसूलचे स्वामीत्वधन बुडत आहे. महसुल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने सामान्य जनता आश्चर्य व्यक्त करत आहे. शिवाय महसूल देखील बुडत आहे.



# अलिबाग शहरात घरफोडी करणारा आरोपी अटक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



अलिबाग शहरात भर दिवसा झालेल्या घरफोडी प्रकरणी चोरट्याला जेरबंद करण्यात स्थनिक गुन्हे अन्वेषण शखेला यश आले आहे. अलिबाग शहरात बाजारपेठेतील ओ-झोन रेसीडेन्सी बिल्डींगमधील फिर्यादी रूपेश कांतीलाल जैन यांच्या घरातून ३ लाख ९५ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल तसेच शेजारच्या घरातील सोन्याचांदीचे दागिने असा मुद्देमाल घरफोडी चोरी करून नेला होता.


अलिबाग मुख्य बाजारपेठेत भरदिवसा झालेल्या या प्रकारामुळे भीतीचे वातावरण निर्माणझाले होते. मुख्य बाजारपेठेत भरदिवसा झालेल्या या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन अज्ञातावर घरफोडी, चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषणला हे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. या गुन्ह्याच्या तपासाकरिता पथक तयार करण्यात आले. त्यानुसार पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांनी लागलीच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सपोनि पवनकुमार ठाकूर, सहा फौजदार भारत श्रीवर्धनकर, पोलीस हवालदार बंधू चिमटे, हणुमंत सुर्यवंशी, अमोल हंबीर, प्रशांत दबडे, नाईक विशाल आवळे, शिपाई ईश्वर लांबोटे असे पथक नेमून त्यांना गुन्हा उघडकीस आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले.त्या पथकाने प्राप्त सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयीत आरोपीच्या फोटोच्या आधारे नवी मुंबई, मुंबई, ठाणे जिल्हयात आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असता तपास पथकातील पोलीस

.../२

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी रुपाली चाकणकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याकडे नवी जबाबदारी आली आहे. चाकणकर यांची अखेर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत राज्य शासनाकडून अधिसूचना जारी करण्यात आली आहे. दरम्यान, चाकणकर या आज या पदाची सूत्रे स्वीकारणार असून राज्यातील वाढत्या महिला अत्याचाराच्या घटना पाहता त्यांच्यापुढे मोठे आव्हान असणार आहे.



विजया रहाटकर यांनी ४ फेब्रुवारी २०२० रोजी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर गेल्या दीड वर्षापासून हे पद रिक्त होते. दरम्यान, मुंबईतील साकीनाका येथील बलात्कार व हत्येची घटना तसेच महिला अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून सातत्याने हे पद भरण्याबाबत मागणी करण्यात येत होती. त्याचवेळी राष्ट्रीय महिला आयोगानेही हे पद रिक्त असल्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. या सगळ्या पार्श्वभूमीवर तातडीने महिला आयोगाला नवं नेतृत्व देण्यात आलं आहे.

राष्ट्रवादीतून रुपाली चाकणकर यांचे नाव या पदासाठी गेल्या काही दिवसांपासून चर्चेत होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये महामंडळ वाटपात हे पद राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाणार हे निश्चित

.../२

# सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते हायमास्ट दिव्याचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरीकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पनवेल महापालिका आणि भारतीय जनता पार्टी तत्परतेने कार्य करत राहणार असल्याचे प्रतिपादन पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी खारघर येथे हायमास्ट दिव्यांच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले. खारघर येथील सेलीब्रेशन हाऊसींग सोसायटीमध्ये नगरसेवक निलेश बावीस्कर यांच्या नगरसेवक निधीमधून हायमास्ट दिवे बसविण्यात आले असून, या दिव्यांचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.

पनवेल महापालिकेमार्फत सिडकोकडून हस्तांतरीत करण्यात आलेल्या विविध सेवा नागरीकांना देण्याचे काम वेगाने सुरु आहे. त्यानुसार खारघर येथील सेलीब्रेशन

.../२



# पूर्वेकडचा पाकिस्तान ?

वंगबंधू शेख मुजीबूर रहमान यांनी स्वतंत्र बांगला देशाची चळवळ चालविली आणि त्यासाठी 'मुक्ती वाहिनी' स्थापली; तेव्हा पश्चिम व पूर्व पाकिस्तानमधील बहुसंख्याकांचा धर्म एक असला, तरी संस्कृती भिन्न आहे, अशी भूमिका होती. पूर्व पाकिस्तान, म्हणजे आजच्या बांगला देशाच्या अस्मितेचा बंगाली भाषा हा प्राण होता आणि तो हिंदू व मुस्लिमांचा एकच होता. या बांगला देशाच्या जन्माचे सुईणपण भारताने इंदिरा गांधी यांच्या पोलादी नेतृत्वाखाली केले. सन १९४७ च्या फाळणीची ती छोटी; पण अर्थपूर्ण परतफेड होती. आज पश्चिमेकडे अफगाणिस्तानात तालिबानी राजवट, शेजारी पाकिस्तानचा अखंड भारतद्वेष, काश्मिरातील वाढता हिंसाचार आणि त्याचवेळी बांगला देशात उफाळून आलेला हिंदूविरोधी हिंसाचार असे चौफेर चिंताजनक चित्र आहे. भारतात वीस कोटी, म्हणजे जगातल्या तिसऱ्या क्रमांकाने मुस्लिम राहतात; तसे बांगला देशातही तिसऱ्या क्रमांकाने हिंदू राहतात. तिथल्यापेक्षा फक्त भारत आणि नेपाळमध्येच जास्त हिंदू आहेत. १५ कोटींच्या बांगला देशात सव्वा कोटी हिंदू आहेत. असे असताना यंदा नवरात्रात दुर्गापूजेच्या मंडपांवर सशस्त्र हल्ले झाले. अनेक घरांत शिरून हिंदू पुरुषांना ठार मारण्यात आले. भारतमित्र शेख मुजीब यांच्या कन्या शेख हसीना वाजेद या सौम्य प्रकृतीच्या आणि हिंदूंना बांगला देशात बरोबरीचे स्थान आहे असे मानणाऱ्या नेत्या पंतप्रधान असताना, हजारो हिंदू घरे सोडून वणवण भटकत आहेत. तेथे दोन प्रकारचे हिंदू आहेत. मोठ्या शहरांमधले डॉक्टर, वकील, प्राध्यापक असे देशात महत्त्वाची भूमिका असणारे हिंदू आणि खेडोपाडी मच्छिमार, कारागीर, शेतकरी व श्रमिक असे दुसरे. या दोन्ही हिंदूंचा खरे तर 'दुर्गापूजा' हा एकच मोठा सोहळा आहे. यंदा तोच अनेक ठिकाणी उधळून लावण्यात आला. अशा हिंस्र हल्लेखोरीला काही तरी निमित्त लागते. एका पूजामंडपात कुराणाची प्रत सापडल्याने पुढचा हिंसाचार झाला, असे सांगण्यात येते. हे खरे असेल, तर सरकारने वेळीच पावले टाकून हा हिंसाचार पसरणार नाही, हे पाहायला हवे होते. तस्लिमा नसरीन यांनी शेख हसीना सरकारवर केलेली कठोर टीका परिस्थितीवर प्रकाश टाकते. त्या म्हणतात, 'बांगला देशाचे नाव आता 'जिहादीस्तान' झाले आहे. हजारो हिंदूंची घरे जाळली. दोन गावे बेचिराख केली. आणि अशा वेळी शेख हसीना बासरी वाजवण्यात व भावाचा वाढदिवस साजरा करण्यात मग्न आहेत...' बांगला देशात कडव्या इस्लामचा प्रभाव काही आज अचानक वाढलेला नाही. तो गेली अनेक वर्षे वाढतो आहे; मात्र तेथील केंद्र सरकारने काही कठोर भूमिकाच घ्यायची नाही, असे प्रथमच घडते आहे. ते काळजी वाढविणारे आहे. 'भारतीय नेत्यांनी यातून काही धडा घ्यावा,' असे शेख हसीना म्हटल्या आहेत. भारतात मुस्लिमलक्ष्यी हिंसाचार झाला, तर त्याचे पडसाद बांगला देशात उमटणारच, असे त्यांना यातून सुचवायचे आहे. हिंदूंची घरे जाळली जात असताना भारत सरकारचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या जात होत्या, हेही विसरता येत नाही. या समस्येने आंतरराष्ट्रीय संबंध आणि हिंदू–मुस्लिम संबंध यांचा भारतीय उपखंडातील व्यामिश्र तिढा पुन्हा समोर आला आहे. यावरचा खरा उपाय, या भागाचा समन्वित, विकासकेंद्री विचार होणे, हा आहे. ब्रिटिशांनी केलेली १९०५ची बंगालची फाळणी, नंतरची देशाची फाळणी हा इतिहास मागे ठेवून पुढे जाण्याची एक संधी 'दक्षिण आशियायी विभागीय सहकार्य परिषदे'च्या (सार्क) निर्मितीने दिली होती; मात्र आज 'सार्क' पुरती निष्प्रभ झाली असून, भारताला 'क्वाड' किंवा इतर पंक्तीत बसणे, भूषणावह वाटते. तेही आवश्यक असले, तरी पाकिस्तानसकट आसपासच्या सर्व छोट्या देशांची मोट बांधून समान हिताचा कार्यक्रम न थकता पुढे रेटत राहणे, नितांत आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पहिल्या शपथविधीला सगळ्या 'सार्क' नेत्यांना बोलावून हे महत्त्वाचे पाऊल टाकले होते; मात्र आज भारत सगळ्या शेजाऱ्यांपासून तुटल्यासारखा झाला आहे. 'इस्कॉन'च्या मंदिरावर हल्ला झाल्याने असेल; पण संयुक्त राष्ट्रांनी या हिंसाचाराची दखल घेऊन शेख हसीना सरकारचे कान टोचले. भारत सरकार हा आपला शत्रू आहे, अशी भावना शेजारी देशांच्या समाजांमध्ये निर्माण झाली, तर त्याची किंमत तिथल्या सामान्य नागरिकांना मोजावी लागू शकते. भारतात सदोदित आगखाऊ वक्तव्ये करणाऱ्या नेत्यांनी हे जरा लक्षात घ्यावे. दुसरीकडे, बंगाली अस्मिता हीच एकेकाळी प्रधान मानणाऱ्या बांगला देशाचा वैचारिक प्रवास पुन्हा पूर्वेकडचा पाकिस्तान होण्यात होता आहे का, हा प्रश्नही चिंता वाढविणारा आहेच.

# तृतीयपंथियांच्या समस्या निवारणाबाबत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रार निवारण बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तृतीयपंथियांच्या समस्या निवारणाबाबत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रार निव–ारण बैठक जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच संपन्न झाली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के–पाटील, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी श्री.जय मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर, पोलीस निरीक्षक श्री.कोल्हे, सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार श्री.पवार, तसेच सर्व नगरपालिका, जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाच्या श्रीमती.वाघमारे, लोकपरिषद संस्थेचे पदाधिकारी तसेच पत्रकार अशोक गायकवाड, आरजू फाऊंडेशनच्या सुश्री मानसी लक्ष्मी आदि उपस्थित होते.

या बैठकीत तृतीयपंथियांच्या तक्रारींचे जलद गतीने प्रभावी नियंत्रण व निवारण करणे महत्त्वाचे असून तसेच त्यांना मतदानाचा हक्क मिळवून देण्यासाठी, आधार कार्ड, रेशन कार्ड, लसीकरण अन्य आरोग्य सुविधा मिळण्याच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका उपायुक्त, सर्व नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांमार्फत जिल्ह्यातील तृतीयपंथियांची इत्यंभूत माहिती संकलित करण्याची सूचना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे.

तृतीयपंथियांच्या तक्रारींचे जलद गतीने प्रभावी नियंत्रण व निवारण करणे, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे, आवश्यकतेनुसार विभागीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळास शिफारस करणे, तृतीयपंथियांना भेडसावणाऱ्या अडचणींचा/समस्यांचा/तक्रारींचा सखोल अभ्यास करणे व योग्य त्या उपाययोजना शासनास सुचविणे, याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सह अध्यक्ष अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उपायुक्त, परिमंडळ–२, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेली सामाजिक क्षेत्रात काम करणारी एक व्यक्ती, तृतीयपंथियांसाठी काम करणाऱ्या नामवंत संस्थांमधील दोन तृतीयपंथिय व्यक्ती हे या समितीचे सदस्य असून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

# भाज्यांचे भाव भिडले गगनाला ; महिलांचे आर्थिक बजेट कोलमडले

**दै.रायगड नगरी । तळा**

सध्याच्या काळात सर्वच वस्तूंचे भाव वाढले असताना आता दैनंदिन लागणाऱ्या भाज्यांचे भाव देखील गगनाला भिडले आहेत.त्यामुळे घरखर्च चालविण्याचे गृहिणींपुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

यावर्षी सुरुवातीला दमदार कोसळलेल्या पावसाने परतीच्या वेळी देखील धुमाकूळ घातल्याने शेतामध्ये असलेला भाजीचा माल मोठ्या प्रमाणावर कुजला आहे. परिणामी भाज्यांची आवक कमी प्रमाणात होत असल्यामुळे भाजी मंडईत भाज्यांचे भाव चांगलेच वधारले आहेत. घाऊक व्यापाऱ्यांना पूर्वीपेक्षा जास्त किमतीने भाज्यांची खरेदी करावी लागत असल्याने परिणामी बाजारपेठेत किरकोळ भाज्यांच्या किमतीत देखील वाढ झाली आहे. गॅस सिलेंडर, ओली, सुकी



मच्छी, किराणा सामान यांच्या किमती आधीच भडकलेल्या असतानाआता बाजार पेठेतील भाज्यांच्या वाढलेल्या दरामुळे गृहिणींना घरखर्च चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

कोरोना काळात काहि जणांच्यानोकरी व्यवसाया वर कुर्हाड घातली आहे तर निसर्गाने सर्वांनाच दगा दिला आहे. ग्रामीण भागात शेती हा एकमेव व्यवसाय आहे. मोल मजूरी मिळत नाही अशी स्थितीआहे. यापूर्वी बाजारपेठेत गावठीभाज्यांची आवक मोठ्याप्रमाणावर होत असल्यामुळे सामान्य नागरिकांना या भाज्यांचा मोठा आधार होता. परंतु परतीच्या पावसाचा गावठी भाज्यांना मोठाफटकाबसलाअसूनभाज्याकुजल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. सध्या बाजारात असलेल्या भाज्यांचे दर. मटार=२०० रू., कोबी=३० रु., फ्लॉवर = ८०रू, वांगी=८० रु, टोमॅटो=८०रू, शिमलामिरची=८०रू, गवार =८० रु, घेवडी=८० रु, कोथिंबीर= ५०/६० रु जुडी, मेथी=३० रु.जुडी, फरस बी=८० रु, गाजर=६० रु.किलो असे दर गगनाला भिडले असून महीलांना संसार गाडा कसा हाकायचा मोठी कसरत करावी लागत आहे.

# उरणच्या आधार सामाजिक संस्थेतर्फे पर्यावरण विषयक जनजागृती

**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व्हावे, पर्यावरणाची हानी टाळावी या दृष्टीकोणातून उरण मधिल आधार सेवाभावी संस्थे तर्फे 'वृक्ष लावा दारोदारी समृद्धी होईल घरोघरी' हे अभियान संस्थे मार्फत राबविले जात आहे. संस्थेच्या वतीने घरोघरी जाऊन नागरिकांना वृक्षाचे रोपटे देण्यात येत आहे. व वृक्षांचे संवर्धन, जतन करण्यात यावे अशी जनजागृती करण्यात येत आहे.

यावेळी संस्थेच्या संचालिका अश्विनी निलेश धोत्रे व संस्थेचे पदाधिकारी ईशानी शिंदे, आवृत्ती पालकर, अर्चना समेळ, अर्चना चोरगे, संगीता ढेरे, संयुक्ता ठाकूर, शर्मिला धाकड आदी संस्थेचे पदाधिकारी यांनी घरोघरी फिरून, वृक्षाचे रोपटे देऊन जनजागृती केली. उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांची संस्थेच्या पदाधिका–यांनी घेऊन संस्थे विषयी व अभियाना विषयी त्यांना माहिती दिली.आंबा पेरू, सिताफळ, जाम, चिकू, फणस, आवळा, तुळस, जास्वंद आदी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

# शिवसेनेच्या पाठपुराव्याला आले यश ; बंद केलेला रस्ता पूर्ववत चालू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलजवळील कोपरा गावातील ये–जा करण्यासाठी बंद झालेला रस्ता आता शिवसेनेच्या पाठपुराव्यामुळे पुर्ववत सुरू होणार आहे.

काही दिवसापूर्वी खारघर शहरातील कोपरा गावामध्ये हुंदई शोरूम सेक्टर– १० समोरील रस्ता पी.डब्ल्यु.डी च्या अधिकाऱ्यांच्या मार्फत बंद करण्यात आला होता. कोपरा गावातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत असल्याने याची शिवसेनेचे शाखा प्रमुख सचिन ठाकुर यांनी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्याकडे निवेदनाद्वारे नागरिकांची व्यथा मांडली. तसेच संबंधित पीडब्ल्यू अधिकाऱ्यांना सुद्धा निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना पनवेल महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, उपशहर प्रमुख प्रकाश गायकवाड व शाखा प्रमुख सचिन ठाकुर उपस्थित होते. त्यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी तात्काळ खारघर विभागातील पी.डब्ल्यु. डी च्या संबंधित अधिकाऱ्यांना याबद्दलचा जाब विचारुन बंद केलेला रस्ता पूर्वरत चालू करण्याकरिता मागणी केली. सदर गोष्टीची दखल घेत पी.डब्ल्यु.डी च्या तुर्भे येथील विभागाने त्वरित रस्त्याचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले.



# वाजे येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्या वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वर्गीय नारायण तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे जिल्हा परिषद वाजे येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

हर्षला तांबोळी यांच्या हस्ते वाजे शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना वह्या वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

# प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने पौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रबुध्द सामाजिक संस्थेच्या वतीने एक दिवस बुद्ध विहारासाठी संकल्पनेचा प्रथम पोर्णिमेचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सर्व धम्मबांधव– धम्मभगिनी यांच्या उपस्थित करंजाडे (बौध्दवाडा) येथील बुध्दविहारात अत्यंत सुंदर पार पडले. यावेळी संस्थेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# लहान मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी पनवेलमध्ये प्रथमच बालक- बाजारचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संस्कार भारती पनवेल समितीच्या माध्यमातून आणि पनवेल महापालिकेचे नगर–सेवक व भाजपचे शहर सरचिटणीस नितीन पाटील यांच्या सौजन्याने लहान मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी पनवेलमध्ये प्रथमच बालक– बाजारचे आयोजन करण्यात आले होते. या बालक बाजाराचे उद्घाटन वैशाली कुलकर्णी यांच्या हस्ते झाले असून या बाजराला नगरसेवक नितीन पाटील यांनी सदिच्छा भेट देत लहानग्यांना प्रोत्साहीत केले.

आपल्या पालकांबरोबर बाजारत जाणे हा लहान मुलांसाठी एक चांगला विरंगुळा असून, यातून त्यांना खरेदी विक्री, नफा–तोटा या गोष्टींचे ज्ञान मिळते.

त्याअंतर्गत लहान मुलांना जीवनावश्यक व्यवहार ज्ञानाची शिकवण मिळावी, या उद्दिष्टाने पनवेल शहरातील पायोनीयर सोसायटी समोरील स्नेह बिल्डींगमध्ये संस्कार भारती समिती पनवेल यांच्या माध्यमातून आणि नगरसेवक नितीन पाटील यांच्या सौजन्याने मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांना प्रोत्सहित करण्यासाठी बालक बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

या बाजारामध्ये लहानमुलांनी दिवाळीचे फराळ, पणत्या तसेच विविध पदार्थांची विक्री केली. तसेच नागरीकांनी या बाजारा भेट देत लहान मुलांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहित केले. या वेळी संस्कार भारती पनवेल समितीच्या अध्यक्षा वैशाली कुलकर्णी, प्रांत समन्वयक सुनीता खरे, प्रांत कोषाध्यक्ष नीला आपटे, कार्यक्रम प्रमुख जुईली चव्हाण, अपर्णा नाडगौडी, रोहिनी टिळक, मकरंद देसाई, पुजा आंबवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अलिबाग शहरात घरफोडी करणारा आरोपी अटक

हवादार अमोल हंबीर यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारा आरोपी हा अबरार अकबर शेख, रा.नागपाडा, मुंबई हा आहे. त्याप्रमाणे माहीती घेतली असता आरोपीत हा सध्या मंडाळा, मानखुर्द, मुंबई येथे वास्तव्य करीत असल्याची बातमी मिळाली.

तपास पथकातील सपोनि पवनकुमार ठाकूर व पथकाने सदर अबरार अकबर शेख, बच २२ वर्षे, सध्या रा.मंडाळा, ३० फीट रोड, मानखुर्द, मुंबई, कायमचा पत्ता श्रीमती यशोदा श्रीनिवास कसबे यांची रूम नं. २१, पहिला मजला, आर.एस.निमकर मार्ग, नागपाडा, फारस रोड, चिखलपाडा, मुळ रा.शेरेगाव, पो. ता.कराड, जि.सातारा यास मंडाळा, मानखुर्द येथून ताब्यात घेवून त्याचेकडे वरीलगुन्हयाचे कामी सखोल विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीचा पुर्व इतिहास पाहाता त्याच्यावर ठाणे, मुंबई परिसरामध्ये दिवसा घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल असून त्यास मुंबई व आजुबाजूचे जिल्हयांमधून तडीपार करण्यात आले आहे.

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी रुपाली चाकणकर

झाल्यानंतर राष्ट्रवादीतून चाकणकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. त्यानंतर याबाबत पुढील प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली असून आजच चाकणकर यांच्या नियुक्तीची अधिसूचना काढण्यात आली आहे. ही नियुक्ती पुढील तीन वर्षांसाठी असणार आहे, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, चित्रा वाघ यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी बढती देण्यात आली होती. ही जबाबदारी सांभाळताना महिलांच्या प्रश्नांवर नेहमीच त्या आक्रमक राहिल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक यशस्वी आंदोलनेही झाली आहेत. राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसची महिला आघाडी सक्षम करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. दौंडमधील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या रुपाली चाकणकर लग्नानंतर राजकारणात उतरल्या आणि यशवंतही झाल्या. नगसेविका ते राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा असा त्यांच्या यशाचा आलेख चढता राहिला आहे.

## परेश ठाकूर यांच्या हस्ते हायमास्ट दिव्याचे लोकार्पण

सोसायटीमध्ये पनवेल महापालिकेचे नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या नगरसेवक निधीमधून हाय मास्ट दिवे बसविण्यात आले आहे. या दिव्यांचे लोकार्पण सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते संपन्न झाले. या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक प्रविण पाटील, निलेश बाविस्कर, भाजप युवामोर्चाचे समीर कदम, वॉर्ड अध्यक्ष आनंद मोकाशी, मोहन भुजबळ, मीडिया सेलचे उपाध्यक्ष कंचन बिर्ला सिंग, सेलिब्रेशन सोसायटीचे अध्यक्ष काटकर, सचिव श्री. चव्हाण, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# बोर्ली येथे ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अडिअडचणी व विविध प्रश्नी सातत्याने प्रयत्नशील असून शासनाने ऑगष्ट २०२० मध्ये एक अधिसूचना प्रसिद्ध करून किमान वेतन मंजूर करण्यात आले.परंतु एक वर्ष होऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही.त्याअनुषंगाने शास–नास वारंवार पत्रव्यवहार करून,समक्ष भेट घेऊन सुद्धा राज्याचे ग्रामविकास खाते व अर्थ विभागाने कोणती कार्यवाही न केल्याने याविरोधात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील कार्यालयावर दि.३१ ऑक्टोबर २०२१ रोजी मोर्चा काढण्यात येऊन धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे व यासाठी रायगडजिल्ह्यातून पाचशे कर्मचारी सहभागी होणार असल्याचे ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे यांनी बोर्ली येथे मुरुड तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे आयोजित सभेत मार्गदर्शन करताना माहिती दिली.

मुरुड तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची सभा बोर्ली ग्रामपंचायत कार्यालयात जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली. रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे, तालुका पंचायत समितीचे एकात्मिक बाल विकास विस्तार अधिकारी संजय शेंडगे, ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष संतोष मोरे, उपाध्यक्ष प्रकाश मुंबईकर, सचीव सागर मालजी, तालुका नियोजक खजीनदार हरिष सुरती सदस्य उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.मजगांव ग्रामपंचायतीचे कर्मचारी संदीप गोसावी यांचे नुकतेच निधन झाले.त्यांना संघटनेच्या वतीने दोन मिनिटे स्तब्धता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांसाठी दि.३१ ऑक्टोबर रोजी संघटनेच्या वतीने बारामती येथे धरणे मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.ग्रामपंचायत कर्मचा–यांना सुधारित किमान वेतन लागू करण्यात यावे, यावलकर समितीच्या शिफारशी मान्य करणे, दहा टक्के आरक्षणा प्रमाणे रिक्त पदांची भरती करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र महामंडळ न देता जिल्हा परिषदेच्या सेवेत समाविष्ट करून घेणे, राहणीमान भत्ता शासनाच्या तिजोरीतून देण्यात द्यावा आदी.कर्मचारी संघटनेच्या मागण्या बाबत सभेत विचार विनिमय करण्यात आला. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सर्वांनी मिळून एकत्रित पणे काम केल्यास गावाचा विकास दूर नाही.ग्रामपंचायत करवसुली शंभर टक्के भर दिला तर कर्मचा–यांना पगार मिळण्यात सोयीचे होईल.असे सरपंच चेतन जावसेन यांनी आपल्या भाषणात सांगितले.यावेळी पंचायत समितीचे एकात्मिक बाल विकास विस्तार अधिकारी संजय शेडगे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# निपक्षपणे कामे केल्यास माथेरान प्रगतीपथावर जाईल ; स्थानिकांना विश्वास

**दै.रायगड नगरी । माथेरान**

रायगड जिल्ह्यातील सर्वांचे आवडतं पर्यटनस्थळ म्हणून सध्यातरी पर्यटकांची माथेरानला सर्वाधिक पसंती असते कारण आजवर इथले नैसर्गिकरित्या लाभलेले या टुमदार स्थळाला वरदान आणि केवळ स्थानिकांनी अबाधित ठेवलेली वनराई याच मुख्य कारणास्तव आजही माथेरानच नैसर्गिक सौंदर्य खुलून दिसते. अनेकदा येणारे पर्यटक हे केवळ इथल्या रमणीय आणि प्रदूषण मुक्त शुद्ध वातावरणात स्वच्छंदी पणाने भटकंती करण्यासाठी एकमेव पर्याय हा इथेच पहावयास मिळतो.

दरवर्षी लाखो पर्यटक इथे नियमितपणे हजेरी लावतात. माथेरानच्या प्रेमाखातर काहीजण आपल्या कुटुंबासह वर्षातून दोन ते तीन वेळा सुध्दा आवर्जून भेटी देतात.येणारे पर्यटक हे खासकरून डोंगर दर्यातून उंचावर नेणाऱ्या माथेरान मिनिट्रेनच्या सफरीचा आनंद लुटण्यासाठी येत आहेत परंतु रेल्वे प्रशासनाची या ट्रेनच्या सेवेबाबत उदासीनता असल्याने नेरळ ते माथेरान ही ट्रेन सेवा अद्यापही उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे दुधाची तहान ताकावर भागवावी लागते त्याप्रमाणे अमन लॉज रेल्वे स्टेशन ते माथेरान रेल्वे स्टेशन दरम्यानचा हा शटल सेवेचा अडीच किलोमीटरचा दहा मिनिटांचा प्रवास करून समाधान मानावे लागत आहे.नेरळ मार्गे माथेरान हाच एकमेव रेल्वे मार्ग आणि याच भागातून मोटार वाहनांचा रस्ता इथे येण्यासाठी उपलब्ध आहे अन्य मार्ग नसल्याने अनेकदा सुट्टयांच्या हंगामात वाहनांची कोंडी मोठया प्रमाणावर दिसते त्यामुळे घाटरस्त्यात आपल्या किंमती गाड्या पार्क करून पर्यटकांना आपल्या सामानासह माथेरान गाठावे लागते.यामुळे वेळ आणि खर्चाचा सुध्दा अपव्यय होतो.

इथे येण्यासाठी अन्य पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात आलेली नसल्यामुळे परिसरातील लोकांची एकप्रकारची मक्तेदारी दस्तुरी नाक्यावर पाहवयास मिळते. याच पर्यटनस्थळावर आपली उपजीविका अवलंबून असताना सुध्दा ही परिसरातील मंडळी नेहमीच माथेरानला केंद्रबिंदू ठरवून आपल्या मागण्या पूर्ण करून घेत आहेत याची अनेक उदाहरणे आहेत. पायथ्याशी असणा-या आदिवासी वाड्यांतील लोक त्यांच्या गावात शासनाने रस्ता तयार



करावा म्हणून माथेरान मार्गावर आंदोलने करून वाहतूक कोंडी करत असतात तर इथे नेरळ येथील उल्हास नदीतून होणाऱ्या पाणी पुरवठा संदर्भात सुध्दा माथेरानला वेठीस धरून स्वतःची महत्वपूर्ण कामे पूर्ण करून घेत आहेत.या सर्व बाबीना माथेरान वासीय अक्षरशः कंटाळून गेले असून शासनाने एखादा तरी पर्यायी मार्ग या ठिकाणी उपलब्ध केल्याशिवाय परिसरातील लोकांची मक्तेदारी संपुष्टात येणार नाही.

माथेरान पर्यटन नगरीला येण्यासाठी नेरळ हुन एकमेव मार्ग उपलब्ध आहे ह्या मार्गेच माथेरानला सर्व वाहतूक व पर्यटक येत असतात पण ह्या मार्गाच्या आजू बाजूला असलेल्या गाव वाड्या आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी माथेरानला वेठीस ठरत असू न त्याचा प्रत्यय नुकताच माथेरान करांना आला येथील रस्त्याच्या बाजूला वसलेल्या गावांना शासन रस्ता बनवून देत नसल्याने ह्या गावकऱ्यांनी चक्क माथेरान ला येणारा मार्ग रोखून धरल्याने विकेंड ला माथेरान ला आलेल्या पर्यटकांला असुविधेस सामोरे जावे लागले हा रस्ता रोको चक्क एक तास करण्यात आला त्यामुळे घाटामध्ये लांबच्या लांब वाहनांच्या रांगा दिसून आल्या असेच काही दिवसांपूर्वी माथेरान ला येणारे पाणी पुरवठा तोडण्याची धमकी देताना येथील जुम्मा पट्टी येथील पंपिंग स्टेशन येथे आंदोलन करण्यात आले होते. माथेरान ला येणारा हा एकमेव मार्ग असल्याने हा मार्ग रोखून धरल्यास आपल्या मागण्या मान्य होत असल्याचे लक्षात आल्यानंतर असे प्रकार सुरू झाले पण त्याचा फटका मात्र माथेरानमधील स्थानिक व्यावसायिकांना बसत आहे त्यामुळेच माथेरान साठी पर्यायी मार्ग असावा अशी मागणी होत आहे.

इथे दिग्गज राजकारणी मंडळी कार्यरत आहेत. परंतु यांच्या आडमुठ्या धोरणामुळे आणि श्रेयवादा मुळेच हे सुंदर गाव अधोगतीला जात आहे. गलिच्छ राजकारणापायी होणाऱ्या महत्वाकांक्षी कामांना खोडा घालण्यात या गावातील राजकीय मंडळी अग्रेसर आहेत. मागील काळात सुध्दा एक पर्यायी व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून फिनिक्युलर रेल्वे मार्गाची सुविधा उपलब्ध होणार होती त्यास सुध्दा तालुक्यातील जबाबदार व्यक्तींनी या महत्वकांक्षी प्रकल्पास केवळ वोट बँकेच्या आधारावर विरोध केल्यामुळे हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. सत्ताधारी असलेल्या शिवसेना पक्षाने आपल्या परीने सत्तेतील प्राप्त झालेल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात मोठया प्रमाणावर विकास कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. राज्यात महाआघाडीची सत्ता असताना येथील अन्य पक्षाच्या नेत्यांनी शासन दरबारी वरीष्ठ नेतेमंडळीशी जवळीक, संबंध, ओळखी आणि आपल्या बुद्धीचा वापर गावाच्या विकासासाठी केलेला नाही की भरीव निधी आणून इथल्या विकासात्मक कामांना गती देण्यासाठी प्रयत्न सुध्दा केलेले नाहीत. सत्तेच्या पलीकडे जाऊन सुध्दा ह्या मंडळींना भरपूर करण्यासारखे होते परंतु श्रेयवादाच्या लढाईत गावाचा विकास खुंटला आहे. अजूनही वेळ गेलेली नाही.गावाच्या उन्नतीसाठी आणि भावी पिढीच्या प्रगतीसाठी सर्वपक्षीयांचा एकोपा यापुढेही जर कायम नसेल तर परिसरातील लोकांची संख्या अगोदरच वाढलेली आहेच हे डोईजड होण्याआधीच एकसंध राहून गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे बनले आहे. इथला भुमिपुत्र आजही कर्जाच्या खाईत गुरफटत गेला आहे. सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या भावी आयुष्याला कलाटणी देण्यासाठी राजकारण्यांनी निपक्षपणे कामे केल्यास माथेरान निश्चितच प्रगतीपथावर जाईल यात तिळमात्र शंका नाही असा स्थानिकांना ठाम विश्वास आहे.

# संक्षिप्त...

## पंडीतशेठ पाटील यांच्या दौऱ्यानंतर म्हसळा शेकापमध्ये नवचैतन्य

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्रीवर्धन मतदार संघाचे संपर्क चिटणीस अलिबागचे माजी आमदार पंडित पाटील यांनी नुकताच म्हसळा तालुक्याचा झंझावती दौरा केला. यामुळे शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून तालुक्यात पक्षाला गतवैभव प्राप्त करण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून आला.

म्हसळा दौऱ्यात पंडित पाटील यांनी पांगलोली नळपाणी योजनेचा प्रश्न सोडविण्यासाठी पक्षाचे जिल्हा चिटणीस तथा जिल्हा परिषदेचे पक्षप्रतोद आस्वाद पाटील यांचे लक्ष वेधुन पांगलोली पाणी टंचाई सोडविण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्याचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले. तोराडी परिसरातील मोबाईल नेटवर्क समस्या सोडवण्यासाठी म्हसळा तहसीलदार व बीएसएनएल अधिकारी यांच्याकडे चर्चा करून ग्रामस्थांच्या अडचणी दूर करण्यासाठी पुढाकार घेतला.

तोराडी कब्रस्तान रस्ता, प्राथमिक शिक्षक उपस्थिती यासारख्या अनेक विषयांवर म्हसळा गटविकास अधिकारी चर्चा करून तालुक्यातील अनेक प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. यावेळी पंडीत पाटील यांनी खरसई, वरवटणे, पेढाबे या गावांना भेटी देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यामुळे शेकाप सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचं काम करणारा पक्ष म्हणुन पुन्हा ताकदीने उभा राहत असल्याने पक्षातील नव्या जुन्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांना बळ मिळाले आहे पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील व माजी आमदार पंडित पाटील यांच्या मार्गदरशनाखाली अनेक प्रलंबित विषय मार्गी लागत असल्याने भविष्यात म्हसळा तालुक्यात पक्षाला जनादेश लाभेल असा विश्वास तालुका युवक अध्यक्ष निलेश मांदाडकर यांनी व्यक्त केला.



## उरण येथील योगा विथ पूनम ग्रुप तर्फे मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

योगा विथ पूनम ग्रुप उरण तर्फे द्रोणागिरी किल्ल्याच्या पायथ्याशी डाऊरनगर येथे मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. १४ वर्षे खालील वयोगट मध्ये प्रथम महेश मुंजे, द्वितीय अरबाज खान, तृतीय अभय वर्मा मुलींमध्ये प्रथम स्नेहा जाधव, द्वितीय साक्षी जाधव, तृतीय तनिष्का बोरसे,१२ वर्षे वयोगट खालील गटात प्रथम सार्थक गिरी, द्वितीय अथर्व डॉलटे, तृतीय सार्थक लवटे तर मुलींमध्ये प्रथम प्रज्ञा मुंजे, द्वितीय हर्षदा माने, तृतीय संचिता गोरे तर लहान गट ९ वर्षा खालील प्रथम दर्शन राठोड, द्वितीय जयेश कातकरी, तृतीय शौर्य चव्हाण व मुलींमध्ये प्रथम पूनम बुरुंगळे, द्वितीय नम्रता चव्हाण, तृतीय श्रुष्टी मनमाने आणि ५ वर्षा खालील गटात प्रथम क्रमांक स्वप्निल वनमाने, द्वितीय स्वरा वाघडे, तृतीय इंद्रणिल येडके यांनी क्रमांक पटकाविला आहे.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष पूनम चव्हाण यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी शिक्षिका बी एम बिंदू, अभिनव कांबळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फुलचंद पाटील, माळाप्पा बुरुगळे, काशिनाथ पाटील, रमण चव्हाण, प्रकाश चव्हाण यांनी विशेष सहकार्य केले.यावेळी राज्यस्तरीय खेळाडू व्ही एम श्रीलक्ष्मी, विवेक यादव, राजन पांडे यांचा सत्कार करण्यात आला. देवकी चव्हाण यांनी त्यांचा सत्कार केला.

## नगरसेवक अनिल भगत यांच्या मार्फत उत्तम दर्जाच्या पिशवींचे मोफत वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा व समर्पण अभियानांतर्गत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. त्या अनुषंगाने पनवेल शहरातील प्रभाग १९ मधील रास्त भाव धान्य दुकानावर राशन घेणाऱ्या लाभार्थ्यांना नगरसेवक अनिल भगत यांच्या मार्फत उत्तम दर्जाच्या पिशवींचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी नगरसेवक अनिल भगत, भाजपचे शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सचिन पाटील, रोहित आटवणे, चंद्रकांत मंजुळे, आदी उपस्थित होते.

## तिसे प्रा.शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप व कपाट भेट

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील प्रा.शाळा तिसे येथे विद्यार्थी वर्गाला शैक्षणिक वाटपासह कपाटाची भेट देण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला.

विधान परिषदेचे आ.अनिकेत तटकरे यांच्या ३९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून रा.जि.प.शाळा तिसे येथे वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप व कपाट आदी कार्यक्रम प्रसंगी येथील सरपंच राकेश कांबळे, सदस्य महेश पवार, सदस्या सोनाली गोरीवले यांच्या हस्ते वह्या व शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. व शाळेला एक आफीस कपाट भेट देण्यात आले. या वेळी श्रीमती श्रद्धा बिरगावले यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. तर मुख्याध्यापक सहदेव कापसे यांनी आ. अनिकेत तटकरे यांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केल्याबद्दल व शाळेसाठी विविध भौतिक साधनांसह अन्य साहित्य देऊन व महत्वाची कामे केल्याबद्दल मान्यवरांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाला सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.माईलस्टोन कंन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार १) श्री.सतीश अनंत कडू, २) श्री.अमोल सुखदेव जरे, यांनी १) श्री.बबन गणू घरत, २) श्री.अजय कृष्णा घरत, ३) श्री.विजय कृष्णा घरत, ४) श्री.कृष्णा गणू घरत यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या जमिनीच्या संपादनापोटी पुनर्वसन व पुर्नस्थापना योजनेप्रमाणे खालील मिळालेला असून सदरहू भूखंडापैकी १० टक्के भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूखंडाचे वर्णन**
**पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वडघर | R-३ | १४३ | ४१० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणत्याही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.

सही/-
ॲड.रेखा किशोर होवाळे
शॉप नं.१३, सेक्टर १ ए,
प्रभात सेंटर, सीबीडी-बेलापूर,
नवी मुंबई-४००६१४
मो.नं.९८१९६३०६३२

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) माधवा कैमल / सुशिला माधवा कैमल, २) कुशल निगडे, ३) ओम प्रकाश यादव, ४) जय प्रकाश श्रावण यादव, ५) वेणू कुमारी / पप्पू बाबू ठाकूर, ६) ग्रेटा फ्लॉयड पिंटो, ७) शब्बीर सय्यद / फरहाना शब्बीर शेख, ८) अंकुर अग्रवाल, ९) स्मिता प्रशांत सावरकर, १०) अंकुर अग्रवाल ऑफिस पत्ता : ऑफिस नं.ब-५५/५६, अग्रवाल ट्रेड सेंटर, ५ मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सी.बी.डी.बेलापूर नवी मुंबई-४००६१४ यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती १) मनिषा संदीप म्हात्रे, २) प्रवीण नामदेव भोईर, ३) अनंत हेंदर डाकी, ४) मनोहर नामदेव भोईर, ५) नारायण नामदेव भोईर, ६) रमेश भानुदास डाकी, ७) रामभाऊ हेंदर डाकी

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. /हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | पोट-खराबा हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४६/८/क | ०.१८.०० | ०.०.०० | १.८१ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची, हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या-येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्याावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा वर नमूद मिळकतीच्या मालकाशी खरेदीच्या व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

बेलापूर
दि.२०/१०/२०२१

सही/-
ॲड.आनंद शिवाजी भोसले
(बी.कॉम एल.एल.बी.)
ऑफिस नं.ब-५५/५६, अगरवाल ट्रेड सेंटर, ५ मजला, प्लॉट नं.६२,
सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई-४००६१४
फोन नं.९३२३१४०६४३

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.संतोष गाडे

### जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात, पनवेल
चौ.अर्ज नं.१२८२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/११/२०२१

१) श्रीमती.शर्मिला शंकर जाधव
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.उमेश शंकर जाधव
वय : २५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कु.करिष्मा शंकर जाधव
वय : २१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
तिघे रा.बि.नं.४ ए, फ्लॅट नं.५०३,
मानसरोवर कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१ ते ६, १९ ते २६, सेक्टर ३४,
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०९ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती आणि २ व ३ यांचे वडील मयत कै. श्री.शंकर रामचंद्र जाधव, रा.बि.नं.४ ए, फ्लॅट नं.५०३, मानसरोवर कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.१ ते ६, १९ ते २६, सेक्टर ३४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे दि.४/०६/२०२० रोजी डी.वाय. पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे निधन झाले. अर्जदार त्यांची पत्नी व मुले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**बि.नं.४ ए, फ्लॅट नं.५०३, मानसरोवर कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ.सो.लि, प्लॉट नं.१ ते ६, १९ ते २६, सेक्टर ३४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०९**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालयावरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्याला सदरहू मयताच्या मिळकतीचा वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालकमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मालकाचे नाव : श्रीमती.वैशाली पांडुरंग मोरे वै १**
**पत्ता : मु.अडनाळे, पो.भानंग, ता.तळा, जि.रायगड**
**गट नं.७३/२२, क्षेत्र ०.७१.००, ०.१०, ००=०.८१.००**
**आकार ०.५० जमिनीचे प्रकार गवत**

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार वारसा हक्क, लीज, व्याज, पोटगी, वहिवाट (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा कोणतेही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य ते कागदपत्रे पुराव्यासहीत पुरावे करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

सही/-
(परेश विनायक म्हात्रे)
कोप्रोली, उरण, जि.रायगड,
महाराष्ट्र-४१०२०६
मो.नं.७७३८३०२८७५

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की, मौजे : बोर्ले, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेले मिळकत ही सौ.कविता हरिश्चंद्र ठाकूर आणि श्री.हरिश्चंद्र अंबाजी ठाकूर यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ सदरी नोंद आहे. सदर मिळकतीचे महसूल दप्तरी वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोर्ले, तलाठी सजा चिखले, ता.पनवेल, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| रस्ते विकास विभाग क्रं.१, कार्यकारी अभियंता मुंबई सौ.कविता हरिश्चंद्र ठाकूर आणि श्री.हरिश्चंद्र अंबाजी ठाकूर | १३५ | एकूण ०-२६-३० हे.आर.चौ.मी. क्षेत्र पैकी सौ.कविता हरिश्चंद्र ठाकूर आणि श्री.हरिश्चंद्र अंबाजी ठाकूर यांच्या हिश्श्याचे ०-१६-८० हे.आर. चौ.मी. क्षेत्र |

मौजे : बोर्ले, तलाठी सजा चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार सौ.कविता हरिश्चंद्र ठाकूर आणि श्री.हरिश्चंद्र अंबाजी ठाकूर यांची वर नमूद बिनशेती मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीदस्ताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीचा अगर संस्थेचा गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, मृत्यूपत्र, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट कटा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येवून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचेबरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वर नमूद मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२०/१०/२०२१

सही/-
सौ.उज्वला शिंदे/साळुंखे
ॲडव्होकेट
३०५६, श्री श्याम दर्शन काळुंद्रे,
ता.पनवेल, जि.रायगड
फोन नं.९८६७३६८०५४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर खोपोली नगरपरिषद हद्दीतील ता.खालापूर, जिल्हा : रायगड येथील लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती.शांता उर्फ सुनिता सुनील भोसले, २) सायली सुनील भोसले, ३) वासंती सुनील भोसले, ४) राणी सुनील भोसले, ५) दर्शन सुनील भोसले सर्व रा.शेडवली, ता.खालापूर, जि.रायगड यांनी मौजे : शेडवली येथील मिळकत सर्वे नंबर २७/६, २८/१५ ब व सिटी सर्व्हे नं.११६४, ११६५ या मिळकतीचे खरेदीखतापूर्वी सरकारी परवानग्या व एन.ओ.सी. तसेच कोर्ट कामासाठी श्री.अशोक श्रीपत भारती राहणार मानकीवली, ता.खालापूर यांना अखत्यारपत्र देण्याचे ठरविले होते. मात्र अशोक श्रीपत भारती यांनी आमच्या अशिलांची दिशाभूल करून नूरमहम्मद कली महम्मद खान, मेहमूदअली बाबुभाई अन्सारी भिवंडी, जिल्हा : ठाणे यांस सदरील मिळकत विकण्याच्या हेतूने दि.१८/०३/२०११ रोजी अखत्यारपत्र दस्तक्रमांक १११८/२०११ चे लाभांत लिहून घेतले. सदरील तथाकथित अखत्यारी यांना आमचे अशिल ओळखत सुद्धा नाहीत या तथाकथित अखत्यारपत्राच्या आधारे तथाकथित अखत्यारी यांनी दि.१६/०५/२०१८ रोजी हक्कसोड दस्त क्रमांक २०१६/२०१८ परस्पर नोंदणीकृत करून घेतले याबाबतची आमच्या अशिलांना काही एक कल्पना दिलेली नव्हती व हेतूतः देणेचे टाळले.

दि.१३/१०/२०२१ रोजी खालापूर दुय्यम निबंधक कार्यालयातून नोंदणीकृत दस्त क्रं.२०१६/२०१८ प्राप्त करवून घेतले. प्राप्त दस्ताचे अवलोकन केले असता सदरील दस्तास जोडलेले तथाकथित अखत्यारपत्रातील कलम ५ (d) मधील मजकूर खोटा बनावट व रचनात्मक आमचे अशिलांना न वाचता विनापरवानगीने नमूद केलेला असून अखत्यारी यांना आमचे अशिल ओळखत नाही. त्यामुळे सदरची जागा अखत्यारी यांना मिळकत विकणेची नाही अखत्यारी बनविणेचे व या अखत्यारपत्राने अधिकार देण्याचा प्रश्नच येत नाही. अखत्यारपत्रातील कलम ५ (d) नुसार सदरची मिळकत विकणे संदर्भी आम्ही तुम्हास केव्हाही व कधीही या कलमात नमूद अधिकार दिले नव्हते व नाहीत सदरील दस्ताचे अवलोकन केल्यावर आम्हास हे कळून आले की, सदर जागेचे सरकारी बाजार भाव ७१ लाख ६३ आहे. त्यावर तुम्ही तीन लाख ५८ हजार पाचशेचा स्टॅम्प ड्युटी भरली आहे. मोबदला रक्कम रुपये १०१००००/- नमूद केले असून विशेष करून सदरील तथाकथित अखत्यार पत्रात आमचे अशिलांचे नावाने एकही रुपया मोबदला रोख अथवा धनादेश रुपाने दिल्याचे कुठेही नमूद नाही. यावरुन तुम्ही आमचे अशिलांकडून सदरची जागा विकत घेण्याच्या हेतूने अखत्यारी यांना म्हणजे त्रयस्थ व्यक्तींना विकणेचे असून सर्वकाही आम्हाला विचारात न घेता खोटे व बनावट रचनात्मक दस्ताऐवज बनवून आमची घोर फसवणूक केली आहे. यावरुन तुमचा खोटा लबाडीचा हेतू स्पष्ट दिसून येत आहे. आमचे अशिलाने दि.१८/०३/२०११ रोजी दिलेल्या नोंदणीकृत अखत्यार दस्तक्रमांक १११८/२०११ या तथाकथित दस्तातील अखत्यारी यांना दिलेले सर्वच्या सर्व अधिकार दि.१८/१०/२०२१ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठवून व या जाहीर नोटीसने रद्द केलेले आहे.

तरी ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांचा मौजे : शेडवली येथील मिळकती सिटी सर्वे नंबर ११६४, ११६५ सर्वे नंबर २७/६, २८/१५ ब या मिळकतीचे तथाकथित अखत्यारी नूरमहमद कलीमहमद खान, मेहमूद अली बाबुभाई अन्सारी, तथाकथित एजंट श्री.भारती अशोक श्रीपत सदरील तथाकथित दस्तास ओळख देणार शंकर लिंबाजी शिंदे शेडवली, जितेंद्र जगन्नाथ भारती मानकीवली यांचेमार्फत ठरविला अथवा अखत्यारी यांनी स्वतःचे नाव या तथाकथित अखत्यारपत्राच्या आधारे खरेदीखत केले. तरीही सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व तो बेकायदेशीर ठरेल. त्याबाबत होणाऱ्या कायदेशीर कारवाईस त्याचे खर्चास व परिणामास सदर व्यक्ती जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : मोहोपाडा
दिनांक : १८/१०/२०२१

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
श्री.एम.एम.मालकर
प्लॉट नं.८, गणेश नगर, पोस्ट : मोहोपाडा,
ता.खालापूर, जि.रायगड, पिन नं.४१०२२२
मो.नं.९९७०१११६२०

# संक्षिप्त...

## येलंगेवाडी ते धारेची वाडीपर्यंतचा रस्ता दिवाळीपर्यंत सुस्थितीत आणणार : आ.भरत गोगावले



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वरील कशेडी घाटामधील भोगाव येलंगेवाडीपासून डोंगरातून महाड तालुक्यातील फौजी आंबावडे येथील धारेची वाडीपर्यंत जाणारा रस्ता पावसाळ्यामध्ये खुपच जीर्णावस्थेचा झाल्याने शिवशक्ती मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आ.गोगावले यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी दिवाळीपूर्वी पाऊस थांबल्यास येलंगेवाडी ते धारेची वाडीपर्यंतचा रस्ता दिवाळीपर्यंत सुस्थितीत आणणार, अशी ग्वाही शिष्टमंडळाला दिली.

गणेशोत्सवावेळी गावाकडे येऊ न शकलेल्या महाड तालुक्यातील दक्षिणटोक भागातील अनेक चाकरमान्यांनी नवरात्रौत्सव काळामध्ये गावाकडे जाताना कशेडी घाटातील भोगाव येलंगेवाडीतील शॉर्टकट रस्त्याचा वापर करून कमी वेळेत गावाकडे पोहोचण्याचा प्रयत्न केला असता या रस्त्यावर अतिवृष्टीमुळे ठिकठिकाणी दरडी कोसळल्याचे तसेच रस्त्यावरून माती तसेच मुरूमाचे ढिग अनेक ठिकाणी साचल्याने दुचाकी तसेच रिक्षा, जीप तसेच मोटारगाड्यांना या रस्त्यावरून वाहतूक करणे जिकिरीचे झाल्याने फौजी आंबावडेतील धारेची वाडीतील ग्रामस्थ आणि तरूणांच्या शिवशक्ती तरूण मित्र मंडळातर्फे महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांना निवेदन देऊन लक्ष वेधण्यात आले.

यावेळी आ.गोगावले यांनी ग्रामस्थांना दिवाळीपर्यंत पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन हा रस्ता पूर्णत्वास जाईल, अशी ग्वाही दिल्याची माहिती सचिन पवार यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस दिली.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# पाणजे पाणथळ क्षेत्रातील बीएनएचएसचा पक्षांचा अभ्यास सक्तीने थांबवला

## स्थलांतरीत पक्षांच्यामुळे नवीमुंबई विमानतळावरील विमानाच्या उड्डाणावर परिणाम होण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडकोने बीएनएचएसवर ३०० हेक्टर क्षेत्रातल्या पांजे पाणथळ क्षेत्रात येणाऱ्या स्थलांतरीत पक्ष्यांच्या उड्डाण प्रकारावरच्या (बर्ड फ्लाइटपॅटर्न) सर्वेक्षण करण्यासाठी नेमले होते. मात्र नवीमुंबई सेझच्या सुरक्षा कर्मचा-यांच्या सक्तीमुळे हे सर्व्हेक्षण थांबवण्यात आले असून या धक्कादायक घटनेवर राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या हस्तक्षेप करावा अशी मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

बीएनएचएसचे हे सर्वेक्षण नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील (एनएमआयए)फ्लाइट्सवर होणा-या प्राभावाला अभ्यासण्यासाठी अतिशय महत्वपूर्ण आहे. या विमानतळाची सेवा येत्या तीन वर्षांमध्ये सुरु होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच दिली आहे. या पाणथळीत दर वर्षी दिड लाखाहून जास्त स्थलांतरीत आणि स्थानिक पक्षी भेट देतात. येथे येणाऱ्या पक्षांना विमानाच्या उड्डाणामुळे त्रास होवू शकतो, किंवा पक्षी विमानांना धडकू शकतात



असा निष्कर्ष बीएनएचएस आणि पर्यावरण तज्ञानी काढला होता.

त्यामुळे पाणजे पाणथळ क्षेत्राचे जैवविविधता उद्यान (बायोडायव्हर्सिटी पार्क) म्हणून संवर्धन करण्याच्या संकल्पनेला तडा जाणार होता. बीएनएचएस शास्त्रीय टीम्स, पत्रकार, निसर्ग छायाचित्रकार आणि स्थानिक मच्छिमार यांना नवीमुंबई सेझ सुरक्षेकडून तसेच काही स्थानिक स्वार्थी लोकांकडून पाणथळ क्षेत्रात प्रवेश करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.बीएनएचएसचे संचालक डॉ बिवाश पांडव पाणजे पाणथळ क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी गेले असताना त्यांना देखील तिथून हाकलण्यात आले.नॅटकनेक्टचे संचालक बी एन कुमार म्हणाले, ही अतिशय गंभीर समस्या आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांना या धोक्याची कल्पना दिली असून पाणजे पाणथळ क्षेत्राचे संवर्धन करण्याची विनंती केली आहे. पांणजे येथील एनएमएसइझेड सुरक्षा कक्ष देखील अनधिकृत आहेत आणि राज्य पर्यावरण संचालकांनी प्रकल्पाचे सीइओ आणि सिडकोला नोव्हेंबर २०२०मध्ये त्यांना तोडण्याचे आदेश दिले होते.तरी देखील, कक्ष आणि सुरक्षेवर काडीमात्र परिणाम झाला नसल्याचे कुमार यांनी सांगितले.

पाणथळ क्षेत्र उधवस्त करण्याचा आणखीन एक प्रयत्न म्हणजे, काही अज्ञात लोकांनी संरक्षित स्थलांतरीत पक्ष्यांना घाबरवून पळवण्यासाठी फटाके लावले होते, असे श्री एकविरा आई प्रतिष्ठानचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी सांगितले. बीएनएचएस ही संस्था नावाजलेली संस्था असून पर्यावरण तसेच पशू पक्षांच्या जीवनावर अभ्यास करत असते. सिडकोने त्यांना या ठिकाणचा अभ्यास करण्यासाठी नेमले आहे. एमटीएचएलच्या न्हावा – शिवडी सागरी सेतूमुळे सागरी जैव विविधतेवर होणार परिणाम या विषयी अभ्यास करण्यासाठी देखिल एमएमआरडीएने या संस्थेची नेमणूक केली आहे.

## कामोठे शहर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी कामोठे शहर मंडळाच्या विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र प्रदान सोहळा संपन्न झाला. कामोठे येथील भाजपच्या कार्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला असून, त्यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकार्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व नियुक्त पदाधिकार्यांना शुभेच्छा देत पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पार्टीच्या कामोठे शहर उपाध्यक्षपदी राजेश म्हात्रे, शहर चिटणीसपदी नारायण पोपेटा, कामोठे शहर ओबीसी सेल अध्यक्षपदी भाऊ भगत व ओबीसी सेल उपाध्यक्षपदी स्वप्नील म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा नियुक्तीपत्र प्रदान सोहळा कामोठे येथील भाजपच्या कार्यालयात संपन्न झाला. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष के.के.म्हात्रे, कामोठे शहर अध्यक्ष रविंद्र जोशी, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, गोपीनाथ भगत, दिलीप पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, प्रदिप भगत, नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, हेमलता गोवारी, ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, युवानेते हॉप्पी सिंग, समाजसेवक आर.जी.म्हात्रे, कामोठे शहर महिला मोर्चा अध्यक्षा वनीता पाटील, महिला भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखेडे, महिला मोर्चा कामोठे सरचिटणीस मनिषा वनवे, शहर उपाध्यक्ष रमेश तुपे, कामोठे शहर युवामोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, रावसाहेब बुधे, नाना मकदुम, उत्तम जाधव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# तळोजा येथील वखार केंद्रातील अधिक्षकानेच केला मालाचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील वखार केंद्रात कामाला असलेल्या अधिक्षकानेच निवृत्त होण्याच्या काही दिवसाआधी वखार केंद्रात ठेवलेला सुमारे ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा माल विनापरवानगी बाहेर काढून त्या मालाचा अपहार केल्याचे उघडकिस आले आहे. रमेश विधाते असे या अधिक्षकाचे नाव असून तळोजा पोलिसांनी त्यांच्या विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सहकार व पणन विभाग अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे तळोजा येथे वखार केंद्र असून या वखार केंद्रामध्ये विदेशातून आयात केलेला व कस्टम विभागाकडून जफ्त करण्यात आलेला वेगवेगळ्या प्रकारचा माल हा कस्टम ड्युटी भरेपर्यंत ठेवण्यात येतो. सदर मालाचे भाडे आयातदाराकडुन वसुल केल्यानंतरच त्यांना त्यांचा माल देण्यात येतो. न्हावाशेवा कस्टम विभागाने २००५ मध्ये खोपोली येथील विप्रास कास्टींग लि.या कंपनीचा एस.एस.मॅग्नेटिक मेल्टींग कॅपचा ग्रेड ४०० एस हा सुमारे ३५ लाख रुपये किंमतीचा माल तळोजा वखार केंद्रामध्ये ठेवला होता.

दरम्यान वखार केंद्राचे अधिक्षक रमेश विधाते हे सायंकाळी वखार केंद्रात गेले होते. त्यानंतर त्यांनी एका ट्रक मध्ये तेथील क्रॅपचा माल भरुन गेटपास न बनविता सदर माल बाहेर काढला.

गत सप्टेंबर महिन्यात वखार महामंडळाचे उप महाव्यवस्थापक किसन टोपे यांनी तळोजा वखार केंद्राची वार्षीक तपासणी केली असता, त्याठिकाणी ठेवण्यात आलेल्या मालापैकी क्रॅपचा माल कमी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे टोपे यांनी त्याबाबत सुरक्षा रक्षकांकडे विचारणा केली असता, अधिक्षक रमेश विधाते यांनी सदरचा माल ट्रकमध्ये भरून नेल्याचे त्यांनी सांगितले. अधिक चौकशीत विधाते यांनी त्यापुर्वी देखील सदर क्रॅपचा माल गेट पास शिवाय नेल्याची माहिती सुरक्षारक्षकांनी दिली.

त्यानंतर उपमहाव्यवस्थापक टोपे यांनी रमेश विधाते यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता, त्यांनी वखार महामंडळाला कोणतीही माहिती न देता, सदर कॅपचा माल ट्रकमध्ये भरून बाहेर काढल्याचे कबुल केले. त्यानंतर वखार महामंडळाकडून मालाची पडताळणी करण्यात आली असता, त्यातील सुमारे ३ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या २० टन मालाचा अपहार झाल्याचे आढळुन आले. त्यानुसार उपमहाव्यवस्थापक टोपे यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी रमेश विधाते यांच्या विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

# सासरकडील मंडळीच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## पतीसह सासरकडील चौघांविरोधात छळवणुकीचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर-२७ मधील रांजणपाडा भागात राहणाऱ्या एका विवाहितेने पती व सासरकडील मंडळीच्या शारीरिक व मानसिक जाचाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकिस आली आहे. पुष्पमकुमारी पवनकुमार संतोषी (२३) असे या विवाहितेचे नाव असून खारघर पोलिसांनी या विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या तिच्या पतीसह सासू सासरे व नणंद या चौघांविरोधात छळवणुकिसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील मृत पुष्पमकुमारी ही मुळची बिहार राज्यातील असुन सध्या ती खारघर सेक्टर-२७ मधील रांजणपाडा येथे पती व मुलासह रहाण्यास होती. पुष्पमकुमारी हिचा मुंबईत रेल्वेत टीसी म्हणून कार्यरत असलेल्या पवनकुमार याच्यासोबत २०१९ मध्ये विवाह झाला होता. त्यावेळी पुष्पम कुमारीच्या वडिलांनी तिला स्त्रीधन म्हणून सर्व प्रकारच्या भेटवस्तु दिल्या होत्या. त्यानंतर पुष्पम कुमारी बिहारमध्ये आपल्या सासरी राहण्यास गेली होती. त्याठिकाणी लग्नाचे काही महिने सुरुळीत गेल्यानंतर पुष्पमकुमारीच्या वडिलांनी लग्नात कमी हुंडा दिल्याच्या कारणावरून तिच्या सासरकडील मंडळींनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली. याबाबतची माहिती तीने आपल्या कुटुंबियांना दिल्यानंतर पुष्पमकुमारीचे वडील तिच्या सासऱ्यांना समजावण्यासाठी गेले होते. त्यावेळी पुष्पमकुमारीचे सासरे सहदेव प्रसाद यांनी लग्नात हुंडा कमी दिल्याचे सांगत त्यांच्याकडे १ लाख रुपये व चार चाकी वाहनाची मागणी केली. पुष्पमकुमारीचे वडिल जनार्दन कुमार यांनी त्यांच्याकडे पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर सहदेव प्रसाद याने जनार्दन कुमार यांना घरातुन हाकलुन बाहेर काढले होते. त्यानंतर त्यांनी पुष्पमकुमारीला शिवीगाळ करुन मारहाण करुन मानसिक व शारीरीक त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर पवनकुमार याने पुष्पमकुमारी हिला खारघर रांजणपाडा येथे आणल्यानंतर देखील त्याचे आई-वडिल व बहिण त्याला फोन करुन पुष्पमकुमारीबाबत खोट्या गोष्टी सांगून त्याला भरवत होते. तसेच तिच्या वडिलांकडून चार चाकी वाहनाची मागणी करण्यास सांगत होते. त्यामुळे पवनकुमारने देखील तिला त्रास देण्यास सुरुवात केली. यादरम्यान, पवनकुमार याचे दुसऱ्या मुलीसोबत प्रेमसंबध असल्याची माहिती पुष्पमकुमारीला मिळाल्यानंतर तिचा आणखी छळ सुरु झाला. याच छळाला कंटाळुन पुष्पमकुमारी हिने आपल्या रहात्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर मृत पुष्पमकुमारीच्या कुटुंबियांनी खारघर येथे येऊन तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी पुष्पमकुमारीचा पती पवनकुमार संतोष, सासरे सहदेव प्रसाद, सासु मालती देवी आणि नणंद सीमा देव या चौघां विरोधात छळवणुकिसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# खालापूर तालुक्यातील हाळ गावात आढळले दुर्मिळ खवले मांजर

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील तिसरे हाळ या गावात दिनांक १९ ऑक्टोबर २०२१ रोजी रात्री ११ वाजाताचे सुमारास, अब्बास धनसे यांच्या घराच्या ओसरीवर विचित्र प्राणी आल्याची खबर त्यांनी अल्ताफ जळगावकर आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या हनिफ कर्जीकर यांना दिली. त्यांनी त्या ठिकाणी जाऊन अवलोकन केल्यानंतर तो प्राणी म्हणजे दुर्मिळ जातीचे खवले मांजर असल्याची त्यांची खात्री झाली.

हनिफ कर्जीकर यांनी प्राणी मित्र गुरुनाथ साठेकर यांच्याकरवी प्राणी अभ्यासक अभिजीत घरत यांच्याशी संपर्क साधला. अभिजित यांनी खवले मांजर हे अत्यंत संवेदनशील असल्याने त्याला सावधानतेने हाताळावे असे सूचित करून खालापूर तालुक्याचे वन अधिकारी राजेंद्र पवार यांना या घटनेची माहिती दिली. तालुका वन अधिकारी राजेंद्र पवार यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यास समवेत अभिजीत घरत यांना सर्व साधनसामुग्रीसह घटनास्थळी दाखल होण्याच्या सूचना केल्या. तोवर त्या दुर्मिळ प्राण्याला पाहण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती, परंतु हनीफ कर्जीकर, अब्बास धनसे, अल्ताफ जळगावकर आणि जागरुक नागरिकांनी सावधानता बाळगत वन खात्याचे अधिकारीही येईपर्यंत त्या खवले मांजराजवळ कोणाला जाऊ न देता त्यावर पाळत ठेवली होती.



अभिजीत घरत आणि खालापूर तालुका वनखात्याचे कर्मचारी तेथे दाखल झाले व त्यांनी त्या खवले मांजराची संपूर्ण शारीरिक तपासणी केली असता त्याच्या अंगाला ला-गलेला चिखल आणि मातीत माखलेली नखे यावरून ते वाट चुकून शिकारीच्या शोधात त्याठिकाणी आल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्याला कोणतीही जखम झाली नव्हती याची खात्री करून त्यांनी त्याला सुरक्षित पिंजर्यात बंद केले आणि वनखात्याच्या नियमाप्रमाणे पंचनामा करून ताब्यात घेतले.

खवले मांजर हे फॉलिडोटा वर्गातल्या मॅनिडी कुळातील मॅनिस प्रजातीतील सस्तन प्राणी असून आशिया व आफ्रिका खंडात सापडतो. हे प्राणी शक्यतो पोकळ झाडे किंवा बिळामध्ये राहतात. खवले मांजर निशाचर असून त्यांचा आहार प्रामुख्याने मुंग्या आणि वाळवी हा आहे. सहसा हा प्राणी एकटा राहतो आणि केवळ प्रजननासाठी नर मादी भेटतात असे सांगत हल्ली खवले मांजराची मांसासाठी शिकार केली जात असल्याचे सांगत, सुरक्षीत वन क्षेत्र कमी झाल्याने ते मानवी वस्तीत आढळल्याची माहिती अभिजित यांनी दिली.

खवले मांजर या प्रजातीला धोका निर्माण झाला आहे. सद्यस्तिथीत त्यांची नोंद खणउछ रेड लिस्टच्या धोका अस-लेली प्रजाती(ढ्ढीशरींशपशव ाशिलळशी )आहे. त्यांच्या जीविताला धोका असल्याने तिसऱ्या हाळमधील जागरुक नागरिकांनी प्रसंगावधान राखून या दुर्मिळ प्रजातीला वाचवल्या बद्दल खालापूर तालुका वन अधिकारी राजेंद्र पवार आणि आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामजिक संस्थेने सर्वांचे कौतुक केले आहे.

# महागाई विरोधात राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचा मोर्चा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या वतीने केंद्र सरकारवर हल्लाबोल करण्यात आला. केंद्राने केलेल्या महागाई विरोधात मोर्चा काढण्यात आला.

केंद्रात मोदी सरकार आल्यापासून पेट्रोल डीझल, गॅस सिलेंडरचे तसेच अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. महागाई वाढली आहे व कोरोनाच्या काळात अनेक तरुण बेरोजगार झाले आहेत. कोकणावर आलेल्या निसर्गचक्रीवादळा दरम्यान केंद्राचे पथक येऊन पाहणी करून गेलं पण कोकणवासीयांची घरच्या घर उद्धवस्त झालेली असताना केंद्राकडून फुटकी कवडी देखील मदत म्हणून मिळालेली नाही. याचा निषेध म्हणून आज भव्य युवक मोर्चाचे आयोजन करण्यात आलं होतं. मात्र अचायन काढण्यात आलेल्या मोर्चामुळे नियोजन नगरपालिका ते तहसीलदार कार्यालय अशी मोर्चाची दिशा होती. यावेळी वारे मोदी तेरा खेल सोने के दाम मे बिकता तेल असा हल्लाबोल राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या वतीने करण्यात आला. घोडा गाडीत बसून पेट्रोल डीझल महागाईचा निषेध करण्यात आला. त्यानंतर श्रीवर्धन तहसीलदार यांना वाढलेली महागाई कमी करण्यासाठीचे मागणीचे पत्र सुपूर्द करण्यात आलं. यावेळी युवक तालुका अध्यक्ष सिद्धेश कोसबे, नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, शहर युवक अध्यक्ष गणेश पोलेकर, भावेश मांजरेकर आदी शहरातील युवक राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## माथेरान मधील पॉइंटला लवकरच नवसंजीवनी मिळणार



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या माध्यमातून जवळपास पंधरा पॉईंट्स विकसीत झाले असून आता लवकरच अन्य काही महत्वाच्या पॉईंट्सला नवसंजीवनी मिळणार आहे यासाठी खुद्द नगरपरिषदेच्या गटनेत्यांनी पाहणी केली असून येथील रमणीय किंग एडवर्ड आणि किंग जॉर्ज हे पॉईंट विकसित करण्यात येतील असे प्रसाद सावंत यांनी सांगितले. यावेळी त्यांनी इको पॉईंट येथील पेव्हर ब्लॉक रस्त्याची पाहणी करून तेथील स्टोल्स धारकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांच्या सोबत जेष्ठ पत्रकार मिलिंद कदम, दत्ताजी शिंदे यांसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.